नभोवाणी व आकाशवाणी : बहुजन हिताय | बहुजन सुखाय ||

अशोक दामोदर रानडे

(मूळ प्रसिद्धी - दीपावली - मे १९६६)

तसे पाहिले तर आपल्या रोजच्या जीवन व्यवहारांतील बराच वेळ रेडिओ व्यापून टाकतो. या ना त्या निमित्ताने रेडिओ वाजत असतो. तो नेहमीच ऐकला जातो असे नाही. किंबहुना अनेकदा पार्श्वसंगीतासारखाच त्याचा उपयोग केला जातो असे वाटते. आणि रेडिओतील कार्यक्रमांतही बराच वेळ संगीताने व्यापलेला असतो. पण त्याही बाबतीत केवळ वेळ भरणे असाच हेतू असतो की, काय असा संशय येतो. संगीत व रेडिओ, आणि रेडिओ व आपण हे दोन्ही संबंध असे काहीसे निरर्थक वाटतात. दोन्हींना अधिक अर्थपूर्ण स्वरूप प्राप्त करून देता येईल का, हा आपल्या विचाराचा विषय आहे.

या संदर्भात शीर्षकातील नभोवाणी व आकाशवाणी या सकृत्दर्शनी समानार्थी शब्दांची योजना सहेतुक आहे हे ध्यानात येईल. नभोवाणी म्हणजे जनतासंपर्काचे एक प्रभावी साधन व आकाशवाणी म्हणजे या साधनाचे भारतीय रूप असा हा फरक. विचार करायचा तोही या दोन दृष्टींनी. एक विशिष्ट जनतासंपर्क साधन म्हणून संगीताच्या कलारूप आविष्कारास नभोवाणी कितपत योग्य हा समस्येचा पहिला भाग, व प्रचलित असलेले 'आकाशवाणी' हे नभोवाणीचे भारतीय स्वरूप या दृष्टीने अधिक उपद्रवी कसे आहे आणि यास उपाय काय हा समस्येचा दुसरा भाग.

साधन या दृष्टीने नभोवाणीच्या जमेच्या बाजू कोणत्या?

चित्रपटसृष्टीप्रमाणेच नभोवाणीबद्दल लोकांना एक झगझगीत आकर्षण वाटत असते. कलावंत, कलावंत होऊ पाहणारे आणि कलावंत नसणारे साऱ्यांनाच नभोवाणीवर 'गाजण्या'ची सुरसुरी असते. यासाठी पैसा व ठेव दोहोंचीही त्यांना फिकीर नसते. यामुळे ताज्या दमाचे कलावंत व साधक यांचा सतत व जवळ जवळ फुकट पुरवठा नभोवाणीला होत असतो. नभोवाणीच्या जमेच्या बाजूची एक महत्त्वाची नोंद ही कच्च्या मालाच्या पुरवठ्याची.

साधन म्हणून नभोवाणीचे जे स्वरूप आहे त्यामुळे नभोवाणीवर होऊ शकणाऱ्या कलाविष्कारांतही काही वैशिष्ट्ये उठून दिसतात. नभोवाणीचा श्रोतृवर्ग अनेक पातळीवरला असूनही त्याच्या अस्तित्वाचे दडपण कलावंताला प्रत्यक्षतः जाणवत नाही. बैठकीत अनेकदा समोरच्या श्रोते-मंडळींतील ल.सा.वि. लक्षात घेऊन, श्रोत्यास उद्देशून कलाविष्कार करणे कलावंतास भाग पडते. हा प्रकार नभोवाणीवरील कार्यक्रमांत होत नाही. किंबहुना नभोवाणीवरील कार्यक्रम करताना आपल्याला आदर्श वाटते तीच कला सादर करणे शक्य असल्याने आपल्या आदर्शाशी अधिक प्रामाणिक राहणे, कलाविष्कारांत अधिक प्रयोगशील बनणे शक्य असते. या तऱ्हेचे कलाविष्कारातील स्वातंत्र्य हे अदृश्य पण ज्याचे अस्तित्व निश्चित आहे अशा श्रोतृवृंदामुळे शक्य होते.

नभोवाणीच्या कार्यक्रमाकरिता साथीदार इ. सर्व आयते उपलब्ध असतात तेही सर्व लहानथोर कलावंतासाठी! एक विशिष्ट साधन म्हणून नभोवाणीच्या उणीवाही तिच्या स्वरूपातूनच उद्भवल्या आहेत.

देवाणघेवाण

वर म्हटल्याप्रमाणे कलावंत, साधक इ.चा अप्रतिहत व स्वस्त पुरवठा नभोवाणीला होतो खरा. पण हे एका मर्यादेपर्यंतच खरे. कलावंत एकदा लोकप्रिय झाला की पैशाच्या दृष्टीने नभोवाणी त्यास अनाकर्षक वाटू लागते. राहता राहिली प्रसिद्धीची व मुक्त कलाविष्कार शक्यतेची बाब. या बाबतीत विशेष प्रयत्न केल्याखेरीज लोकप्रिय, बाहेर मागणी असलेले कलावंत नभोवाणीवर येत राहणे अवघडच.

श्रोतृसमुदायाचे प्रत्यक्ष दडपण न जाणवणे या दुसऱ्या फायद्यासही अशीच एक तोट्याची बाजू आहे. श्रोत्यांचे दडपण जसे जाणवत नाही, तसेच त्यांच्या उत्तेजनाने, त्यांनी दाद दिल्याने फुलणारी उत्स्फूर्त सर्जनशीलताही अशक्य होते. कलावंत व श्रोते यांच्यातील देवाणघेवाणीस भारतीय संगीतात किती महत्त्वाचे स्थान आहे हे कुठल्याही रंगलेल्या बैठकीत आढळण्यासारखे आहे.

साथीदारांच्या बाबतीतही एक उणीव संभवते. प्रत्येक कलावंताच्या आविष्काराची स्वतंत्र अशी एक शैली असते. कलात्म असलेली शैली म्हणजे रागताल इ. तत्त्वांचे एकात्म असे दर्शन ठराविक साथीदारांबरोबर नेहमी गात-वाजवत राहिल्याने अनेक वेळा कलावंताच्या शैलीच्या या एकात्मतेत, प्रभावी आविष्करणात वेगळ्या साथीदारांबरोबर गात-वाजवताना एक प्रकारचा फुटीरपणा येण्याचा संभव असतो. नेहमीचे साथीदार कलावंतांना समंजस साथ देऊन उचलून धरत असतात. साथीचे वेगळेपण त्यांच्या बाबतीत जाणवत नाही. याच्या अभावी कलावंत व साथीदार यांचे सवतेसुभे स्थापन होऊन त्यांच्या विकृत चढाओढीचे प्रदर्शन आपल्यापुढे होते.

काही रास्त उणीवा

या खेरीज नभोवाणी या साधनाद्वारे होणाऱ्या कलाविष्काराबाबत आणखी काही उणीवा आहेत. पैकी काही तांत्रिक स्वरुपाच्या आहेत. उदाहरणार्थ ध्वनिक्षेपकाद्वारे प्रसारित होऊन आपल्या कानापर्यंत पोहोचेपर्यंत वाद्याचा व गायकाचा ध्वनि पुष्कळदा बदलतो. अनेकदा असे आढळते की, प्रत्यक्ष ज्यांचा आवाज बरा वाटतो तोच नभोवाणीद्वारा ऐकतांना कर्कश वाटतो. जसे काही चेहरे छायाचित्रानुकूल (Photogenic) असतात तसेच आवाजांबाबत काहींचे आवाज माइकला अधिक योग्य असतात.

जनतासंपर्काचे एक प्रभावी साधन या दृष्टीने नभोवाणीच्या शक्याशक्यता पाहताना वरील मुद्दे लक्षात घ्यावे लागतात. या सर्व उणीवांचा कमीअधिक परिहार करणे व सामर्थ्यस्थानांचा जास्तीत जास्त फायदा उठविणे शक्य आहे. या संदर्भात आकाशवाणीचा विचार करू.

प्रारंभी निर्देशिल्याप्रमाणे आकाशवाणी म्हणजे भारतीय संदर्भात नभोवाणी. भारतीय संदर्भात नभोवाणीत काही दोष अधिक शिरले आहेत.

घातक परिणाम

आकाशवाणीने 'बहुजन सुखाय बहुजन हिताय' असे ब्रीदवाक्य धारण केले आहे. हे बहुजन कोणते? त्यांना हितकर काय? आणि सुखकर काय? तीन्ही प्रश्नांची उत्तरे आकाशवाणीने आपल्या मगदुराप्रमाणे देऊन टाकली आहेत. आणि इतर सरकारी संघटनांप्रमाणे आकाशवाणीनेही या एकदाच देऊन टाकलेल्या उत्तरांचा पुन्हा, बदलत्या परिस्थितीतही विचार न केल्यामुळे तिच्यापुढील प्रश्नांच्या समस्या झाल्या आहेत. संगीतेतर कार्यक्रमांबाबतही याचे घातक परिणाम दिसतातच. मात्र आपण फक्त संगीताच्या संदर्भातच विचार करणार आहोत.

'बहुजन' म्हणजे रेडिओ ऐकतील ते सारे. रेडिओ हे एक साधन असल्याने त्याचा उपयोग करणारे ते सारे आपल्या कार्यक्रमांची आखणी करताना डोळ्यापुढे ठेवावेत यात काहीच आक्षेपार्ह नाही. पण लोकसत्ताक, कल्याणकारी राज्याच्या अंतिम ध्येयाने प्रेरित होऊन लौकिक आणि सांस्कृतिक लोकजीवनाचा अधिकाधिक भाग व्यापू पाहणाऱ्या संघटनेने एवढाच विचार करून भागेल काय? सध्या रेडिओ कोण ऐकतात याच बरोबर रेडिओ कोणी ऐकावा याचाही विचार करणे आवश्यक नाही काय? अस्तित्वात असलेला आपला श्रोतृवर्ग आणि नजिकच्या भविष्यात ज्यांनी रेडिओकडे वळावे अशी अपेक्षा असते या दोन्हींचा विचार करून आकाशवाणीने आपले कार्यक्रम आखले पाहिजेत. या दूरदृष्टीच्या अभावी संबंधित सांस्कृतिक घटकांचे प्रवाही बदलते स्वरूप दुर्लक्षून त्याच्या साचेबंद, सुरक्षितपणे ज्याला मान्यता देता येईल अशा कलाप्रवाहालाच प्राधान्य देऊन कार्यक्रमांची आखणी होते. नव्या जाणिवा, नव्या आकांक्षा घेऊन येणारा श्रोता व कलावंत, कलेचे थिजलेले स्वरूप टाकून तिला नवजीवन देणारा नवीन कलाप्रवाह या साऱ्यांची बूज न राखता होणाऱ्या कार्यक्रमाच्या आखणीने होणारे परिणाम काहीसे सूक्ष्म पण निश्चित व म्हणूनच अधिक घातक ठरतात.

आंधळी घाई, शुष्क संगीत

आकाशवाणीने संगीताची वर्गवारी केली आहे. शास्त्रीय, सुगमशास्त्रीय, सुगम, लोकसंगीत इ. या साऱ्यांच्या मागच्या सांगीतिक प्रेरणा अगदी भिन्न नसल्या तरी प्रकृतिदृष्ट्या वेगवेगळ्या असतात. यानुसार विचार करून आखणी केली तर प्रत्येक प्रकार आपापल्या गुणवैशिष्ट्यांसह, त्याच्या पूर्ण समृद्धतेत सादर करता येईल. उदा. शास्त्रीय संगीत घ्या. रागविस्तार हे वैशिष्ट्य असलेल्या या प्रकाराला १५ मिनिटे, अर्धा तास वेळ असतो. हा वेळ कलाविष्कारास पुरा आहे का? बऱ्याच कलावंतांना अर्धा तासही झेपत नाही हे उत्तर नव्हे. अशा कलावंतांना कार्यक्रम दिलेच पाहिजेत ही सक्ती आकाशवाणीने स्वतःवर लादून घेतली आहे. वर उल्लेखिलेल्या 'बहुजन' कल्पनेचे भूत यास जबाबदार आहे. पं. रविशंकर यांनी एकदा म्हटल्याप्रमाणे बऱ्याच सामान्य कलावतांना 'चान्स' देण्यापेक्षा निवडक कलावंतांना वारंवार बोलवूनच कलेची उन्नती होईल. संगीताचे स्वरप्रधान संगीत व शब्दप्रधान संगीत असे दोन महत्त्वाचे विभाग आहेत. शास्त्रोक्त संगीताचा पहिल्यात समावेश होतो. सुगम-शास्त्रीय व सुगम संगीताचा दुसऱ्या विभागात. या प्रकारचे जे संगीत सादर केले जाते त्यात अर्थगर्भ उच्चार व त्याला दडपून न टाकताही आपले रूप स्थापित करणारे स्वरांचे साज यांचा आढळ कितीसा होतो? या विशिष्ट संगीतप्रकाराची प्रकृती लक्षात न घेता सुगम संगीताच्या हिश्श्यामध्ये (chunk) काहीतरी हवेच म्हणून सादर होणारे संगीत म्हणजे बहुजनांना सुगम संगीत आवडते. ते सादर करण्याची आंधळी घाई होऊन गरजणारे शुष्क संगीत त्या त्या विशिष्ट प्रकाराच्या विकृत प्रचाराने श्रोत्यांची 'संगीत-संविद'च बिघडवून टाकते. यासारखे दुसरे पाप नाही.

कलेचा खालावलेला दर्जा

विशिष्ट कलाप्रकाराच्या प्राकृतिक वैशिष्ट्यांची जाणीव नसणे हा आकाशवाणीचा पहिला दोष. आणि 'बहुजनां'ना कार्यक्रम देण्याचा प्रयत्न करणे हा दुसरा. 'बहुजनां'ना पेलणारे कार्यक्रम हवेत असे आकाशवाणीचे पायाभूत सूत्र आहे. याचा अर्थ असा की, विशिष्ट प्रकारचा कार्यक्रम केवळ उच्चाभ्रूंसाठी नसावा व अगदी सामान्यांसाठीही नसावा असा प्रयत्न केला जातो. संगीताबाबतीत बोलावयाचे तर 'अमक्याचे संगीत उच्च असते पण सामान्य श्रोत्यास आवडणार नाही' असे म्हणून टाळले जाते वा त्याच्या बाबतीत काळ, सादर केले जाणारे संगीत इ. बाबतीत 'सूचना' केल्या जातात. तबल्याचे कार्यक्रम बंद (जवळजवळ) होणे हे एक या बाबतीतील ठळठळीत उदाहरण आहे. वास्तविक ज्या दर्जाचे गायन सादर केले जाते त्या दर्जाचे तबलावादक खूपच आहेत. याचा अर्थ असा नव्हे की, असे तबलावादन सततच सादर केले जावे. बहुजनांना चालते वा अधिक लोकांना संधी देणे यात बहुजनांचे हित आहे ही

कल्पनाच सदोष आहे. गायन काय, वादन काय दोन्हींना कसोटी एकच हवी ती म्हणजे गुणवत्तेची. यासाठी 'संधी देणे' या कल्पनेचे उच्चाटन झाले पाहिजे. अनेक पातळीवरील कलावंतांना कार्यक्रम देण्यात कलेचा दर्जा निश्चितपणे खालावतो.

हे सारे आणीबाणीच्या निमित्ताने

वर आकाशवाणीचा अतिव्याप्तीचा दोष सांगितला. आता अव्याप्तीचा दोष. ज्या उच्च दर्जाच्या कलावंतांना आकाशवाणी वारंवार बोलावते (तौलनिक दृष्ट्या) त्यांनाही आकाशवाणी मोकळ्या मनाने सामोरी जात नाही. इतरांच्या मानाने वेळ व पैसा या बाबतीत आकाशवाणीची नेहमीची बंधने थोडी सैल होतात खरी, पण शास्त्रापुरतीच आकाशवाणीची जास्तीत जास्त बिदागी १५० रु. आणि एका कलावंताला मिळणारा जास्तीत जास्त वेळ १॥ तास. तोही ठरलेला समय. भारतीय संगीतात साऱ्या वेळच्या वेगवेगळ्या रागांची निश्चित अशी खुमारी आहे. या साऱ्यांचे वैभव आकाशवाणीवरून आहे या हिस्सेदार प्रक्षेपणामधून (Chunk Broadcasting) कधीच ऐकायला मिळण्याची आशा नको!

आणीबाणी म्हणून आमंत्रितांसमोर केले जाणारे कार्यक्रम बंद केले. संमेलन रद्द केले. रणजी ट्रॉफी इ.चे धावते वर्णन मात्र चारही दिवस! आणीबाणीच्या संदर्भात खेळ आणि कला यांत डावेउजवे ठरविण्यास कोणता तात्विक आधार मिळाला ते एक आकाशवाणीच जाणे! आपल्या धोरणांमुळे कलाविष्काराची शिखरे गाठण्यास आकाशवाणी असमर्थ ठरते आहे. कार्यक्रमांची आखणी अशी हवी की, सामान्य दर्जाच्या कलावंतांना त्यांत कमीत कमी वाव आणि उच्च दर्जाच्या कलावंतांना जास्तीत जास्त वाव मिळावा.

संगीताची आलेखरेषा

आकाशवाणीच्या कार्यक्रम योजनेमागील तत्त्वे व आकाशवाणीची उद्दिष्टे यातच कमजोरपणा असल्याने अस्सल व कसदार कला आकाशवाणीच्या वाऱ्यासही फिरकत नाही हा फक्त एक भाग झाला. या तात्त्विक गोंधळाबरोबरच प्रत्यक्ष कार्यक्रम सादर होत असता तांत्रिक बाबीतही आकाशवाणी कसे गाढ अज्ञान दाखविते याचाही विचार आवश्यक आहे. आकाशवाणीची यांत्रिक साधनसामुग्री जुनी, ऐतिहासिक काळातील आहे या प्रकारचा आक्षेप आता मांडायचा नाही. याही पेक्षा मूलभूत मुद्दा आहे तो आपल्या जवळच्या सामुग्रीचा आकाशवाणी अशा तऱ्हेने उपयोग करते की, त्यामुळे संगीताच्या परिणामकारक व प्रभावी आविष्कारासच बाधा येते. उदा. शास्त्रीय संगीताचा कार्यक्रम चालू होतो. प्रारंभी गायक वा वादक सप्तकाच्या खालच्या भागात गात वा वाजवीत असतो. आकाशवाणीच्या नियंत्रण कक्षातले लोक लगेच आवाजाची पातळी वाढवून ठेवतात आणि जरा गायक वरच्या स्वरास स्पर्श करू लागतो तोच पातळी कमी करतात. इकडे ऐकणाऱ्याला कानी पडणाऱ्या संगीताची आलेखरेषा सारखी वर-खाली होत राहते. संगीताचा जो एक एकात्म परिणाम एरवी होतो तो इथे अशक्यच ठरतो. आकाशवाणीच्या तंत्रज्ञांनाही सादरीकरणाचे भान (program-sense) आवश्यक तो यासाठी.

तंत्रज्ञही संगीतज्ञ असावा का?

हल्ली आकाशवाणीवरचे बरेचसे कार्यक्रम आधी ध्वनिमुद्रित केलेले असतात. या कार्यक्रमांचे ध्वनिमुद्रण असलेच तर केवळ अपघाताने चांगले असते. सर्वांत महत्त्वाचा दोष वेगवेगळ्या वाद्यांच्या आवाजांच्या संतुलनाचा (Balancing). या बाबतीत महत्त्वाची गोष्ट असते ती प्रत्येक वाद्याच्या आवाजाचे विशिष्ट गुणधर्म (इंग्रजीत त्याला Timbre म्हणतात). ही गोष्ट साधण्यासाठी एकापेक्षा अधिक ध्वनिग्राहक (Mikes) वापरणे, प्रत्येक कलावंताच्या आवाजानुसार साथीदारांची जागा ध्वनिग्राहकापासून कमीअधिक दूर ठेवणे इ. पथ्ये पाळावी लागतात. आकाशवाणीतील स्टूडिओत साथीदार व प्रमुख कलावंत इ.साठी ज्या परंपरागत

जागा आखून ठेवलेल्या असतात त्यांत कलावंत पाहून बदलणे हे आकाशवाणीच्या लक्षातच बहुधा नसते. मग नियंत्रणकक्षातील तज्ञांनी Balancing वगैरे वापरून आवाजांतील दोषांची तीव्रता कमी करणे इ. विशेष खटपटींविषयी तर बोलायलाच नको. Balancing म्हणजे प्रत्येक वाद्याचा आवाज त्याच्या वैशिष्ट्यांसह निर्मळपणे ऐकू येणे. आता हा निर्मळपणा ओळखण्यास वाद्यांचे मूळ आवाज ओळखता आले पाहिजेत. आकाशवाणीवरील तंत्रज्ञ संगीतज्ञ असले पाहिजेत असे नाही पण संगीत विषयक गरजा कोणत्या याची त्यांना सुस्पष्ट आणि निश्चित जाणीव हवी. आकाशवाणीत तिचा आढळ सहजासहजी होत नाही.

बेसूर बदसूर आवाजांचा कल्लोळ

आकाशवाणीच्या बाजूने होणाऱ्या ढोबळ तांत्रिक चुकांच्या निर्देशापाठोपाठ कलावंतांच्या बाजूने होणाऱ्या चुकांचाही निर्देश केला पाहिजे. प्रथमत:च स्पष्ट केलेले बरे की, कलावंतांच्या बाजूने होणाऱ्या चुकांतही आकाशवाणीचा हात असतोच कारण बऱ्याच वेळा पुरेशा सूचना व पूर्वतयारी यांच्या योगे या चुका टाळता येण्यासारख्या असतात. याही बाबतीत आकाशवाणी उदासीनच राहते.

या संदर्भात गायकांनी लक्षात ठेवण्यासारखी गोष्ट म्हणजे रेडिओवरून होणारा कार्यक्रम श्रोत्यांना अगदी कानाजवळ चालावा तसा ऐकू येतो. बारीकसारीक भासणारे, बैठकीत खपून जाणारे दोष हे रेडिओच्या श्रोत्यांना मोठे व नजरेत भरण्याइतके सहजासहजी कळतात. म्हणूनच गाता गाता खोकणे, खाकरणे इ. प्रकार संपूर्णतया निषिद्ध मानले पाहिजे. रेडिओवरच्या कार्यक्रमाचा प्रभावीपणा आपण नादांच्या दुनियेची कशी उभारणी करतो यावर अवलंबून असतो. ही सारी दुनिया एखाद्या बेसूर, बदसूर आवाजानेही धरणीकंप झाल्यासारखी डगमगते. बैठकीत गायनांतर्गत गोष्टींखेरीज साथीदार, त्यांचे आपसांतले संकेत आणि सर्वांपेक्षा महत्त्वाचा म्हणजे कलावंतांच्या व्यक्तिमत्वाचा प्रत्यक्ष संपर्क असल्याने तेथील संगीताची मोहिनी अधिक मजबूत असते. रेडिओवर फक्त संगीत हाच श्रोते-कलावंतांतला दुवा. या दृष्टीने संगीताचे वातावरण जरासुद्धा बिघडू न देणे अत्यावश्यक ठरते. ध्वनिग्राहकाच्या लगतच वाजल्याने गायिकांच्या हातांतले जास्त जोराने ऐकू येणारे व मधून मधून बंद पडणारे तंबोरे हा एक मोठाच तापदायक प्रकार असतो.

याची चर्चा झालीच पाहिजे!

गायक-वादकांनी एक लक्षात ठेवण्यासारखी गोष्ट म्हणजे रेडिओवरचा कार्यक्रम हा रंगवीत न्यायला फारसा अवसर नसतो. आहे त्या वेळात उत्तमोत्तम नग निवडून दाखविण्याची विक्रेत्याची जबाबदारी कलावंतावर असते. गळा वा हात तापवणे, पुरेशी पूर्वतयारी असणे फार आवश्यक ठरते. कार्यक्रमाआधी धावपळ टाळणे, कार्यक्रमाच्या दिवशी बोलून वा ओरडून आवाजाला ताण न पडेल अशी खबरदारी घेणे ही पथ्ये अवश्य. काही वेळा जास्त वेळ वातानुकूलित स्टूडिओमध्ये राहूनही आवाज बसतो. अशा वेळी थोडा खालचा सूर घेतल्यास आवाज टांगून ठेवून गाण्याची आपत्ति ओढवत नाही.

नभोवाणी-आकाशवाणी-संगीत या त्रयीच्या संबंधाचे तात्त्विक अधिष्ठान काय असावे या संबंधीचे काही विचार वर मांडले आहेत. अखेरीस कला-कलावंत यांना आजच्या धावपळीच्या यांत्रिक युगास जमेस धरूनच वाटचाल करावयाची आहे. आकाशवाणीसही भविष्यात सर्व सांस्कृतिक क्षेत्रांत अधिकाधिक भार उचलायचा आहे. वरील विचारांनी अधिक मूलभूत व तपशीलवार चर्चेस चालना मिळाली तरी बरेचसे साधले म्हणायचे!